॥ अंतरी पेटवू ज्ञानज्योत ॥

# कवयित्री बहिणाबाई चौधरी उत्तर महाराष्ट्र विद्यापीठ, जळगाव

# Kavayitri Bahinabai Chaudhari North Maharashtra University, Jalgaon

## जनसंपर्क विभाग

**बातमी क्र.१**

जळगाव दि. १ ( ) कवयित्री बहिणाबाई चौधरी उत्तर महाराष्ट्र विद्यापीठाच्या ज्ञानस्त्रोत केंद्रात आयोजित करण्यात आलेल्या ग्रंथ प्रदर्शनाचे उद्‌घाटन कुलगुरु प्रा.पी.पी.पाटील यांच्या हस्ते झाले.

चार दिवसीय या ग्रंथ प्रदर्शनात जळगाव व पुणे या ठिकाणाहून भारतीय प्रकाशनांची पुस्तकेप्रदर्शित करण्यात आली आहेत. मंगळवारी कुलगुरु प्रा.पी.पी.पाटील यांनी प्रदर्शनाचे उद्‌घाटन केले. यावेळी प्रा.ए.यू.बोरसे, ज्ञानस्त्रोत केंद्राचे संचालक डॉ.अनिल चिकाटे, सहायक ग्रंथपाल विजय आहेर, माहिती शास्त्रज्ञ डॉ.निलिमा म्हस्के तसेच ज्ञानस्त्रोत केंद्रातील कर्मचारी उपस्थित होते. हे ग्रंथ प्रदर्शन १८ जानेवारी पर्यंत सुरु राहणार आहे.

----------------------------------------------------------------------------------------------------

**बातमी क्र.२**

जळगाव दि. १६ ( ) : कवयित्री बहिणाबाई चौधरी उत्तर महाराष्ट्र विद्यापीठाच्या भाषा अभ्यास प्रशाळा व संशोधन केंद्राच्या वतीने मराठी भाषा संवर्धन पंधरवडा निमित्ताने दि.१५ जानेवारी रोजी सूर्योदय सर्वसमावेशक मंडळाचे श्री.सतीश जैन यांची प्रकट मुलाखत आयोजित करण्यात आली होती.

या कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी प्रशाळेचे संचालक प्रा.म.सु.पगारे होते. या मुलाखतीत श्री.जैन यांनी सूर्योदय सर्वसमावेशक मंडळाचा सुरुवातीपासूनचा प्रवास उलगडला तसेच सूर्योदय साहित्य संमेलनाच्या आयोजनामागील भूमिका आणि उपलब्धी बाबत सखोल चर्चा केली. १९८९ साली युथ फारम मंचच्या माध्यमातून सुरु झालेला प्रवास ते नंतर २००४ साली गिरीजा कीर यांच्याकडून प्रेरणा घेऊन नामांतरण करुन सूर्योदय साहित्य मंडळ दर वर्षी जिल्हा, विभाग व राज्यस्तरीय साहित्य संमेलने आयोजित करित आलेली आहे. मुलाखतीतून जैन यांनी सांगितले की साहित्य संमेलनाद्वारा प्रस्थापित दिग्गज साहित्यिकांची मते जाणून घेता येतात आणि नवोदित साहित्यिकांना एक विचारमंच उपलब्ध करुन देऊन त्यांना प्रेरीत करता येते आणि साहित्याला समृध्द करण्यात हातभार लागतो आणि साहित्य रुची व छंद ही जोपासता येत असल्याचे मत त्यांनी प्रकट केले.

अध्यक्षीय समारोपात प्रा.म.सु.पगारे, श्री.सतीश जैन यांच्या कार्याबद्दल बोलताना म्हणाले की, मराठी साहित्य समृध्द करण्यासाठी साहित्य वर्तुळात चांगले कार्य सूर्योदय साहित्य मंडळाच्या वतीने करण्यात येत आहे.समाजात अशा प्रकारे साहित्य उपासना करुन नवा आदर्श नव्या पिढीने घ्यावा व साहित्याला पर्यायाने मराठी भाषेला समृध्द करुन तिचे जतन व संवर्धन करण्याचा ध्यास घ्यावा. सदरील कार्यक्रमास इंग्रजी विभागाच्या प्रमुख डॉ.मुक्ता महाजन, डॉ.आशुतोष पाटील तसेच प्रशाळेतील शिक्षक व विद्यार्थी उपस्थित होते. प्रकट मुलाखतीत मराठी विभागातील मयुर कुंभार व विद्यार्थ्यांनी प्रश्न विचारले. सुत्रसंचालन प्रा.दिपक खरात व आभार नेत्रा उपाध्य यांनी मानले.

----------------------------------------------------------------------------------------------------

जा.क्र.कबचौ उमवि/१६/हस्तदेय/२०१९ दिनांकः- १६ जानेवारी, २०१९

प्रति,

**मा. संपादक / प्रतिनिधी,**

कृपया, उपरोक्त बातमी आपल्या दैनिकातून प्रसिध्द करावी, ही विनंती.

आपला विश्वासू,

स्वाक्षरीत प्रत/-

( डॉ.सुनील पाटील )

जनसंपर्क अधिकारी